## विवाहपूर्व सल्ला : एक पाऊल सुखी सहजीवनाकडे!

'विवाहपूर्व सल्ला' – Premarital Counseling म्हणजे काय? आणि त्याची खरंच गरज आहे का?

आजची कौटुंबिक आणि सामाजिक परिस्थिती लक्षात घेता लग्नापूर्वी काही बाबींचा विचार करून मगच पुढची पायरी चढण्यात शहाणपण आहे. यामुळे नवपरिणित जोडप्याचे परस्परातील संबंध अधिक परिपक्व आणि आयुष्यभरासाठी दृढ होतील.

'विवाहपूर्व सल्ला' यामध्ये विचारात घेतले जाणारे मुद्दे म्हणजे योग्य जोडीदाराचे गुण आणि त्याच्या वागण्यातील विसंगती, परस्परांबद्दलच्या रास्त अपेक्षा, नातेसंबंधाची जपवणूक, लग्नानंतरच्या संघर्षाचे विषय आणि ते सोडविण्याची क्षमता प्राप्त करणे इत्यादी. या विषयांची लग्नापूर्वीच थोडी चर्चा झाली तर मुला–मुलींची मानसिक तयारी होते. तसेच लग्न म्हणजे जबाबदारीची बाब आहे हे दोघांनाही कळते. त्यामुळे लग्नापूर्वी आणि लग्नानंतर वयापरत्वे वागण्यातला उथळपणा कमी होऊन विचार प्रगल्भ होतात. त्याचबरोबर भावनात्मक पातळीवर विकास होणेही फार आवष्यक असते. जेणेकरून समोरच्या व्यक्तीच्या भावना समजून त्यानुसार आपल्या वागण्यातून बरोबर प्रतिसाद देऊन परिस्थिती कुषलतेने हाताळता येते. म्हणजे यषस्वी आयुष्यासाठी केवळ बुद्धिमत्ता आणि बुद्ध्यांक (Intelligence Quotient = IQ) हे एकचमाप नसून भावनिक बुद्धिमत्ता (Emotional intelligence & Emotional Quotient = EQ) हेही महत्वाचे आहे. EQ जास्त असलेली व्यक्ती भावनात्मक पातळीवर परिपक्व समजल्या जाते. अषा व्यक्तीची कौटुंबिक आणि सामाजिक व्यवहारात यषस्वी होण्याची शक्यता जास्त असते. म्हणून लहानपणापासूनच EQ वाढविण्याचे प्रयत्न व्हायला हवेत.

साधारणतः जोडीदार निवडताना वय, षिक्षण, पैसा, उंची यामधे मुलगा मुलीपेक्षा श्रेष्ठच असावा असे अपेक्षित असते. पण ते बरोबरीचे का नसावेत ह्या विषयावर चर्चा जरूर व्हावी. प्रत्येक कुटुंबात जर स्त्रीपुरूषांना समान हक्क असण्याचे विचार जन्माला आलेत तर स्त्रीमुक्ती–स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीयांचे अधिकार याबद्दलचे प्रष्न आपोआपच निकालात निघतील. तसेच कष्टाळूवृत्ती, प्रामाणिकपणा, निर्व्यसनीपणा हे निकषही जोडीदार निवडताना पुढे ठेवायला हवेत.

विवाहपूर्व मार्गदर्षन हे एकटे नसून चार टप्प्यांत असावे. पहिला टप्पा म्हणजे 'कुटुंब जीवन षिक्षण', दुसरा टप्पा म्हणजे विवाहापूर्वी मुलामुलींना आवष्यक असलेले मार्गदर्षन, तिसऱ्या टप्प्यात नवपरिणीत जोडप्याचे आवष्यक ते मार्गदर्षन आणि चौथ्या टप्प्यात आयुष्यात कधी–कधी उद्भवणाऱ्या पेच प्रसंगांमध्ये आवष्यक तो सल्ला होय. अषा प्रकारच्या मार्गदर्षनामुळे कौटुंबिक आणि सामाजिक अषा दोन्हीही पातळींवर यषस्वी होण्यास मदत होते.

एकूण असे की, लग्नापूर्वीच्या काळातला गोडवा दोघांनीही थोडयाफार प्रमाणात तरी संपूर्ण आयुष्यभर जपला तर सहजीवन त्यातील कष्टांसहीत सुखी होईल.

डॉ. सौ. प्राजक्ता कडूसकर